# उल्हासनगर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६. विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०४/१०/२०२३

# प्रेसनोट

आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत "माझी माती, माझा देश" या उपक्रमांतर्गत महापालिका मा. प्रशासक तथा आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग समितीचे प्रभाग अधिकारी यांच्या अखत्यारीत असलेली माती व तांदूळ भरलेले अमृत कलश मा. प्रशासक तथा आयुक्त यांच्याकडे सुपूर्द करणेसाठी "अमृत कलश यात्रा" चे आयोजन दि.०४/१०/२०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता करण्यात आले.

सदर अमृत कलश महापालिका प्रांगणांत आल्यानंतर महिला अधिकारी सौ. प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव, सौ. छाया डांगळे, जनसंपर्क अधिकारी, सौ. श्रध्दा बाविस्कर, सिस्टम ॲनलिस्ट, उद्यान अधिक्षक दिप्ती पवार, शिक्षण मंडळाचे लेखा अधिकारी, निलम कदम यांनी अमृत कलश घेऊन आलेल्या प्रभाग अधिकाऱ्यांचे स्वागत केले.

सदर कार्यक्रमात महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांनी लेझीम, कवायत व नृत्य सादर केले. तसेच महापालिका कर्मचारी श्री. रामवीर करोतीया यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. मा. आमदार, श्री. कुमार आयलानी व महापालिका आयुक्त श्री. अजीज शेख यांनी, प्रभाग समिती कार्यालयांमार्फत जमा केलेले माती व तांदूळ भरलेले कलश दि.२७ ऑक्टोबर, २०२३ रोजी आझाद मैदान जमा करण्यात येणार आहे व त्यानंतर सदरचे कलश दिल्लीला नेण्यात येतील व त्यांचा वापर येथे मोठे उद्यानासाठी करण्यात येईल अशी माहिती करून दिली.

सदर कार्यक्रम वरील महिला कर्मचारी यांनी व्यवस्थित नियोजन करून पार पाडला, त्यामुळे त्यांचेही मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजीज शेख यांनी कौतुक केले. तसेच उपस्थित असलेल्या पत्रकार, प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडीया यांचेही आभार मानले.

सदर कार्यक्रमास महापालिका अतिरिक्त आयुक्त श्री. जमीर लेंगरेकर, उपायुक्त श्री. अशोक नाईंवाडे व सौ. प्रियंका राजपूत, सहा. संचालक नगररचना श्री. ललीत खोब्रागडे, मुख्य लेखा अधिकारी श्री. किरण भिलारे, मुख्य लेखा परीक्षक श्री. शरद देशमुख, महापालिका सचिव सौ. प्राजक्ता कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी सौ. छाया डांगळे, शिक्षण विभागाचे लेखा अधिकारी श्रीम. निलम कदम, सिस्टम ॲनलिस्ट सौ. श्रध्दा बाविस्कर, उद्यान अधिक्षक दिप्ती पवार, भांडार अधिकारी श्री. अंकुश कदम, पर्यावरण विभाग प्रमुख सौ. विशाखा सावंत मालमत्ता व्यवस्थापक, सौ.अलका पवार, सहा. सार्वजनिक आरोग्य अधिकारी श्री. मनिष हिवरे, मुख्य बाजार निरीक्षक श्री. विनोद केणे व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व महापालिका शाळेचे विद्यार्थी उपस्थित होते.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.